SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004
Phone : EPABX –2609000 Special Cell – (0231) 2609148 Gram :UNISHIVAJI
Fax : +91-231-2691533 & 2692333 Website : www.unishivaji.ac.in E–mail : spcell@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६ ००४
फोन इपीबीएक्स. २६०९००० विशेष कक्ष २६०९१४८
फॅक्स् : ९१–२३१–२६९१५३३ व २६९२३३३
Estd : 1962
NAAC 'A' Grade
MHRD – NIRF- 28th Rank

जा.क्र.विशेष कक्ष/All college/194 दिनांक– 12 JAN 2017

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक/सेक्रेटरी,
सर्व संलग्नीत महाविद्यालय/संस्था.

विषय : विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या संस्था/महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर पदांची आणि विद्यार्थी प्रवेशाची माहिती युजीसीला/विद्यापीठाला पाठविणेबाबत.
आणि
शिक्षक व शिक्षकेत्तर पदांची बिंदूनामावली महाविद्यालयाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करणेसाठी युजीसीच्या दि. ३०/११/२०१६ च्या पत्रानुसार कार्यवाही करणे.

महोदय/ महोदया,

विद्यापीठाशी संलग्नीत असणा–या संस्था/महाविद्यालये यांना कळविण्यात येते की, विश्वविद्यालय अनुदान आयोग (यु.जी.सी), नवी दिल्ली यांनी दि. ३०/११/२०१६ रोजीच्या पत्रान्वये महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांची विहित नमुन्यामध्ये माहिती मागविली आहे. सोबत सदर पत्राची व विहित नमुन्याची प्रत आपणास देण्यात येत असून त्यानुसार आपल्या महाविद्यालयाची माहिती तात्काळ भरुन विश्वविद्यालय अनुदान आयोग (यु.जी.सी), नवी दिल्ली व विद्यापीठास ई–मेलद्वारे पाठवावी.

आणखी महत्वाचे असे की, यु.जी.सी च्या दि. ३०/११/२०१६ रोजीच्या उपरोल्लेखित पत्रामध्ये संलग्नित महाविद्यालयांनी आपल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा–यांची दि. ०२/०७/१९९७ च्या भारत शासनाच्या आरक्षणविषयक धोरणानुसार अद्ययावत केलेली बिंदूनामावली महाविद्यालयाच्या संकेत स्थळावर नियमित प्रसिद्ध करणे आवश्यक आहे असे नमूद केले आहे. तेव्हा त्यानुसारचीही आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

सोबत : वरीलप्रमाणे
जा.क्र. विशेष कक्ष /
दिनांक :

आपला विश्वासू
संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

प्रत : १) आस्थापना पी.जी. विभाग २) आस्थापना विभाग –२ ३) पी.जी. प्रवेश विभाग
यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004**
Phone : EPABX –2609000 Special Cell – 2609148
Website : www.unishivaji.ac.in
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६ ००४**
फोन इपीबीएक्स. २६०९००० विशेष कक्ष २६०९१४८

Estd : 1962
NAAC 'A' Grade
MHRD – NIRF- 28th Rank

जा.क्र.विशेष कक्ष/ All College/232 दिनांक : 24 MAR 2017
तात्काळ

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक/~~सेक्रेटरी~~,
सर्व संलग्नीत महाविद्यालये/संस्था.
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय— महाविद्यालयातील बिंदुनामावली व सेवाजेष्ठता यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करून त्याची माहिती पाठविण्याबाबत...**

**संदर्भ— १) मा.सहसंचालक, (उच्च शिक्षण) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि—२४/११/२०१६ रोजीचे पत्र**
**२) या विभागाचे क्र. विशेष कक्ष/All College/१९४ दि—१२/०१/२०१७ रोजीचे परिपत्रक**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयसंदर्भाकित पत्रास अनुसरून आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, महराष्ट्र राज्य यांनी सोबतच्या शासन संदर्भिय पत्रान्वये श्री. तोंडचिरक यांनी आपले सरकार या पोर्टलवर केलेल्या तक्रारीस अनुसरून प्रत्येक अनुदानित महाविद्यालयाचे रोस्टर व सेवा ज्येष्ठता यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणे बंधनकारक करावे अशी विनंती केलेली आहे. तेंव्हा सोबतच्या शासन पत्रास अनुसरून विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या महाविद्यालयाची बिंदुनामावली व सेवाजेष्ठता यादी ज्या—त्या संस्था/महाविद्यालयांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याची आहे. सदर कामी आपल्या संस्था/महाविद्यालयाची वेबसाईट विद्यापीठाच्या संकेतस्थळाशी Link केली जाईल. यास्तव आपल्या संस्थेची/महाविद्यालयाचे संकेतस्थळ व उपरोक्त माहिती प्रसिध्द केलेले संकेतस्थळावरील ठिकाण इ. माहिती दि—३१/०३/२०१७ पुर्वी विद्यापीठास कळवावी.

याबाबत केलेली कार्यवाही शासनास तातडीने कळविणे आवश्यक असल्याने कार्यवाही प्रथम प्राध्यान्याने करावी. ज्या महाविद्यालयांकडून सदरची माहिती विहित वेळेत कळविली जाणार नाही अशा महाविद्यालयांची नावे शासनांस कळवावी लागतील याची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू

श्री ए.एस.नलवडे
उपकुलसचिव

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004
Phone : EPABX –2609000 Special Cell – 2609148
Website : www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६ ००४
फोन इपीबीएक्स. २६०९००० विशेष कक्ष २६०९१४८

Estd : 1962
NAAC 'A' Grade
MHRD – NIRF- 28th Rank

जा.क्र.विशेष कक्ष/All college/41

दिनांक :- 6 JUL 2017

स्मरण पत्र–२

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालये/संस्था.
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय– महाविद्यालयातील बिंदुनामावली व सेवाजेष्ठता यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करून त्याची माहिती पाठविण्याबाबत...

संदर्भ–१) मा.सहसंचालक, (उच्च शिक्षण) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि–२४/११/२०१६ रोजीचे पत्र
२) विद्यापीठाचे क्र. विशेष कक्ष/All College/१९४ दि–१२/०१/२०१७ रोजीचे परिपत्रक
३) विद्यापीठाचे क्र. विशेष कक्ष/All College/२३२ दि–२४/०३/२०१७ रोजीचे परिपत्रक

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयसंदर्भांकित पत्रास अनुसरून आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांची बिंदुनामावली व सेवा ज्येष्ठता यादी ज्या–त्या संस्था/महाविद्यालयांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करून संकेतस्थळावरील Link ठिकाण इ. माहिती दि–३१/०३/२०१७ पुर्वी विद्यापीठास सादर करणेबाबत संदर्भ क्र. २ नुसार कळविण्यात आले होते. तथापि, आपणाकडून याबाबतची कार्यवाही झालेली दिसून येत नाही. तेंव्हा संस्था/महाविद्यालयची बिंदुनामावली व सेवाजेष्ठता यादी महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करून संकेतस्थळाचे नाव, त्याची बिंदुनामावली Link विद्यापीठास तात्काळ कळवावी.

सबब, याबाबत केलेली कार्यवाही शासनास तातडीने कळविणे आवश्यक असल्याने कार्यवाही प्रथम प्राधान्याने करावी. ज्या महाविद्यालयांकडून सदरची माहिती विहित वेळेत कळविली जाणार नाही अशा महाविद्यालयांची नावे शासनास कळविण्यात येतील याची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू

उपकुलसचिव

Estd : 1962
NAAC 'A' Grade

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004, MAHARASHTRA
Phone : EPABX –2609000 Special Cell –2609148
Website : www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६ ००४, महाराष्ट्र
फोन इपीबीएक्स. २६०९००० विशेष कक्ष २६०९१४८

जा.क्र./विशेष कक्ष/All college/6 दिनांक :– 12 JAN 2018

स्मरण पत्र–३

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालये/संस्था.
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय**– महाविद्यालयातील बिंदुनामावली व सेवाजेष्ठता यादी महाविद्यालयाच्या/संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करून त्याची लिंक व ठिकाण इ. माहिती पाठविण्याबाबत.

**संदर्भ**– १) मा.सहसंचालक, (उच्च शिक्षण) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि–२४/११/२०१६ रोजीचे पत्र
२) विद्यापीठाचे क्र. विशेष कक्ष/All College/१९४ दि–१२/०१/२०१७ रोजीचे परिपत्रक.
३) विद्यापीठाचे क्र. विशेष कक्ष/All College/२३२ दि–२४/०३/२०१७ रोजीचे परिपत्रक
४) विद्यापीठाचे क्र. विशेष कक्ष/All College/४१ दि–०६/०७/२०१७ रोजीचे परिपत्रक.

महोदय/महोदया,

विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयातील परिसंस्थेतील शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांची बिंदुनामावली व सेवा ज्येष्ठता यादी ज्या–त्या संस्था/महाविद्यालयांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करून संकेतस्थळावरील Link ठिकाण इ. माहिती दि–३१/०३/२०१७ पूर्वी विद्यापीठास सादर करणेबाबत उपरोक्त संदर्भित परिपत्रकानुसार कळविण्यात आले आहे. तथापि, आपणाकडून याबाबतची कार्यवाही अद्यापि झालेली नाही. याबाबत आदेशान्वये कळविण्यात येते की, आपल्या संस्था/महाविद्यालयांची बिंदुनामावली व सेवाजेष्ठता यादी महाविद्यालयाच्या/संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करून संकेतस्थळाचे नाव, त्याची बिंदुनामावली Link विद्यापीठास तात्काळ कळवावी. बिंदुनामावली संकेतस्थळावर ठेवण्याची कार्यवाही पूर्ण झालेनंतर संकेतस्थळावरील ठेवण्यात आलेल्या बिंदुनामावलीच्या PATH (पाथ) चा ~~उल्लेख~~ पत्रामध्ये स्पष्ट उल्लेख करावा.

याबाबत केलेली कार्यवाही शासनास तातडीने कळविणे आवश्यक असल्याने कार्यवाही प्रथम प्राधान्याने करावी. ज्या महाविद्यालयांकडून सदरची माहिती विहित वेळेत प्राप्त होणार नाही अशा महाविद्यालयांच्या बिंदुनामावलीबाबत व जाहिरात मंजुरी प्रस्तावाबाबत कार्यवाही प्रलंबित ठेवण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू

उपकुलसचिव